रेग्युलर दिवाणी दावा क्र.३६/२०२४
नि.क्र.३१/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.१

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>

१. मी जिल्हाधिकाऱ्यांना बांधकाम काढून घेण्यासाठी २०२४ साली जो अर्ज दिला होता त्याची पोहोच पावती दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी कधीही अडथळा निर्माण केला नाही. प्रतिवादी क्र.१, ४ व ६ यांच्या आदेशानुसार बांधकाम झाला होता. यापैकी नेमक्या कोणत्या प्रतिवादीनी मला बांधकामाचा आदेश दिला होता याबाबत मला माहीत नाही. मी प्रतिवादी क्र.१, ४ व ६ यांना दावा दाखल करण्याअगोदर कायदेशीर नोटीस दिली नव्हती. अतिक्रमण झाल्याबाबत मला दोन वर्षापुर्वी समजले. साक्षीदार पुन्हा सांगतो की, बांधकाम झाले होते त्यावेळी मी मोजणी केली, तेव्हा प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे मला समजले. मोजणीचा नकाशा मी प्रकरणात दाखल केलेला आहे.

नकाशा दाखल करण्यासाठी पुढील उलटतपास तहकुब.

दि.११/०२/२०२५

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.

आज वादीतर्फे साक्षीदार क्र.१

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. के.व्ही. पंढरीकर यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>

२. मी दावा मिळकतीची मोजणी, मोजणी कार्यालयातून करुन घेतली होती. मी मोजणी नकाशा व त्यासंदर्भातील कागदपत्र का दाखल केले नाही याचे कारण सांगू शकत नाही. ग्रामपंचायतीचा बांधकाम २०२३ साली झालेला आहे.

**प्रश्नः** तुम्ही दावा मिळकतीचे मालक आहे हे ७/१२ उताऱ्यानुसार सांगत आहात का?
**उत्तरः** होय.

**प्रश्नः** ३ हे. १६ आर विवाद मिळकतीचे आपण कब्जेदार आहात हे दर्शवणारे तुमच्याकडे ७/१२ व्यतिरिक्त कोणता कागदोपत्री पुरावा आहे का?
**उत्तरः** नाही.

**प्रश्नः** दि.२६/१२/२०२३ रोजी तुमची व प्रतिवादी क्र.१, ४ व ६ यांची भेट झाली का?
**उत्तरः** नाही.

<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ ते ५ तर्फे वकील श्री. एस.एम. पटेल यांचेमार्फत शपथेवर सुरु.</u>

३. माझे एम.बी.बी.एस. झालेले आहे. मी लातूर येथे राहून व्यवसाय करतो. माझे गावातील घरात येणे जाणे असते. माझ्या जमिनीचा सर्वे नं.३/आ आहे. मोजणी नकाशामध्ये ग्रामपंचायतीने माझ्या जागेवर अतिक्रमण केल्याचे दर्शवले आहे किंवा नाही याबाबत मी सांगू शकत नाही. मोजणी कोणत्या तारखेला झाली हे मी सांगू शकत नाही. ग्रामपंचायतीचा बांधकाम २०२३ साली झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीचा संपूर्ण बांधकाम २०२० मध्ये झालेला आहे. ग्रामपंचायतीचा बांधकाम विवाद मिळकतीच्या पश्चीम बाजुला झालेला आहे.

प्रतिवादीने बांधकाम करताना अतिक्रमण केले आहे.

**प्रश्नः** तुम्ही अतिक्रमण झाल्याबरोबर दावा का दाखल केला नाही?
**उत्तरः** ग्रामपंचायतीने मला मोजणी करुन घेऊन जर अतिक्रमण निघाले तर तुम्हाला ताबा देतो असे सांगितले.

४. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीने मला मोजणी करुन घेऊन जर अतिक्रमण निघाले तर तुम्हाला ताबा देतो असे सांगितले हे मी खोटे सांगत आहे. मी स्वतः जिल्हाधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायतीविरुध्द तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी, समाधान, धर्मराज बिराजदार, सिध्देश्वर बिराजदार व माधव बिराजदार यांच्यामार्फत तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायतीने त्यांच्या मालकीच्या जागेत बांधकाम केले आहे. मी अतिक्रमण केल्यासंदर्भात कागदपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामपंचायतीचा जागा हडप करायच्या उद्देशाने सदरचा खोटा दावा दिलेला आहे. मी संयुक्त मोजणी करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.04.08 17:26:05 +0530

दि.०८/०४/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.